Indian Academy of Pediatrics (IAP)

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## प्रकरण ७० :

# रक्ताचा कर्करोग असलेल्या मुलांची काळजी कशी घ्यावी

रक्ताचा कर्करोग हा लहान मुलांमधील कर्करोगातला सर्वात जास्त आढळणारा आजार आहे. आता मुलांवर योग्य ते उपचार झाल्याने त्यातून ती बचवण्याचीही शक्यता खूप वाढलेली आहे. हे उपचार दीर्घकाळ चालतात. त्यामुळे त्या मुलांची पालकांनी घरी काय काळजी घ्यावी लागते याबद्दलची माहिती अतिशय आवश्यक आहे.


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. रेणू बोराळकर

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोलकर, सौ. लीना पागे

*Convener:* **Gaurav Kharya**

*Members:* **Gaurav Narula, Moushumi Roy Choudhury, Prashant V Kariya**

*Reviewer:* **Pooja Dewan**




## वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न

१. ल्युकेमिया/ब्लडकॅन्सर म्हणजे काय? तो कशामुळे होतो? ब्लडकॅन्सरमध्ये विविध प्रकार आहेत का?

२. माझ्या मुलामध्ये कॅन्सर कोणत्या स्टेजला आहे हे कसे ओळखायचे? तो पूर्ण बरा होऊ शकतो का?

३. उपचारचा कालावधी किती मोठा असेल? उपचार कठीण असेल का? माझ्या मुलाला किमोथेरपीचे साईडइफेक्ट्स सहन होतील का?

४. संपूर्ण उपचार ॲडमिट करूनच केले जातील का?

५. Induction थेरपी संपल्यानंतर पुढे अजून काही उपचार लागेल का?

६. मुलाची उपचार चालू असताना काय काळजी घेतली पाहिजे?

७. उपचार चालू असताना मुलाला ताप आला तर काय करावे? मी ताप कमी होईपर्यंत थांबू शकतो का? की त्याला त्वरित उपचार दिले पाहिजेत?

८. सेंट्रल लाईन म्हणजे काय? ती कशासाठी लागते? त्याच्याशिवाय आमच्या मुलाला इंजेक्शन्स देता येतील का?

९. आमचे बालरोगतज्ज्ञ आमच्या मुलाला त्याचे रुटीन लसीकरण करून घ्या म्हणून सांगत आहेत. कॅन्सरचे उपचार चालू असल्याने बरीच लसीकरणे चुकली आहेत. म्हणून आता त्याचा इलाज चालू असताना आम्ही लस देऊ शकतो का? आम्ही त्याच्या भावंडांनाही लसी देऊ शकतो का?

१०. माझ्या आईने सांगितले की काही आयुर्वेदिक औषधे आहेत, ज्यामुळे कर्करोग पूर्ण बरा होईल. ही औषधे घेणे सुरक्षित आहे का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator



Ch-070.indd 1 22-09-2021 12:39:18

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# 70

# रक्ताचा कर्करोग असलेल्या मुलांची काळजी कशी घ्यावी

प्रश्न (१)

## ल्युकेमिया/ब्लडकॅन्सर म्हणजे काय? तो कसा होतो? ब्लडकॅन्सर/ल्युकेमियाचे वेगवेगळे प्रकार आहेत का?

- ल्युकेमिया हा पांढऱ्या रक्तपेशींचा कर्करोग आहे. मुलांमध्ये ल्युकेमिया हा सर्वात जास्त आढळणारा कर्करोगाचा प्रकार आहे. तो अस्थिमगजामध्ये (bone marrow) विकसित होतो आणि रक्तामध्ये पसरतो. शरीरात सर्वत्र रक्ताभिसरण होत असताना याच्या पेशी संपूर्ण शरीरात फिरतात.
- जोखमीचा कोणताही घटक आणि ल्युकेमिया यांच्यातील नेमका संबंध सांगता येत नाही. तथापि काही अनुवंशिक परिस्थितीमुळे ल्युकेमिया होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ डाऊनसिंड्रोम, fanconi ॲनिमियामुळे होतो.
- पालकांच्या चुकीमुळे किंवा विशिष्ट आहाराचे पालन न केल्यामुळे होत नाही. तसेच हा संसर्गजन्य आजार नाही.
- हा कॅन्सर कुठल्याही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक मर्यादांना जुमानत नाही. सर्वात सामान्य ल्युकेमिया हा तीव्र lymphoblastic ल्युकेमिया (ALL) आहे जो सुमारे ७०–८० टक्के मुलांमध्ये होतो तर २०–३० टक्के मुलांमध्ये acute myeloid leukemia (AML) असतो.
- दोन्ही जरी रक्ताचेच कर्करोग असले तरी त्यांची लक्षणे वेगवेगळी असतात आणि त्यामुळे त्यांच्या उपचारपद्धतीमध्ये फरक आहे.


मुलांमध्ये ALL या ब्लडकॅन्सरचे प्रमाण जास्त असल्यामुळे आणि मुलांमधील ल्युकेमियाच्या रूग्णांची घ्यावी लागणारी काळजी सारखीच असल्यामुळे आपण यापुढे ALL वर चर्चा करणार आहोत.

**प्रश्न (२)**

## माझ्या मुलाचा ब्लडकॅन्सरचा कोणत्या टप्प्यात/स्टेजला आहे व तो कॅन्सर बरा होऊ शकतो का?

ल्युकेमिया हा रक्ताचा कॅन्सर आहे आणि रक्त शरीरात सर्वत्र फिरत असल्याने ल्युकेमियाची टप्पेवारी ल्युकेमियाच्या प्रकारावर आणि त्याच्या आण्विक वैशिष्ट्यांवर आधारित केले जाते. रोगाचा धोका ठरवण्यासाठी एक महत्त्वाचा मापदंड म्हणजे उपचारांना दिलेला प्रतिसाद जो किमान अवशिष्टरोगाच्या (minimal residual disease) निरीक्षणाद्वारे ठरवला जातो. ल्युकेमियाच्या व्यवस्थापनाचा टप्पा ठरवण्यासाठी हे एक सुरुवातीचे साधन आहे. याला जोखीम स्तरीकरण (risk stratification) असे म्हणतात आणि येथे नमूद केल्याप्रमाणे ह्याची विस्तृतश्रेणी आहे. हे डॉक्टरांना उपचाराची तीव्रता आणि काही प्रमाणात उपचार कालावधी ठरवण्यास मदत करते

गेल्या काही वर्षांमध्ये बालरोगतज्ज्ञ आणि संशोधकांनी मुलांच्या ल्युकेमियाच्या यशस्वी उपचाराची टक्केवारी सुधारण्यासाठी खरोखरच खूप प्रयत्न केले आहेत. ALL उपचारपद्धतीची यशोगाथा उल्लेखनीय आहे. अलीकडच्या काळात ९०% पेक्षा जास्त ALLच्या मुलांवर यशस्वी उपचार होतात, ही टक्केवारी आधीच्या काळी दहा टक्क्यांपेक्षा कमी होती. जर आपण उपचारांचे काटेकोरपणे पालन केले आणि बालकर्करोतज्ज्ञांनी (child oncologist) दिलेल्या सर्व सल्ल्यांचे काटेकोरपणे पालन केले तर कॅन्सर बरा होऊ शकतो.




**आकृती १ :** आजाराच्या तीव्रतेनुसार उपचार अधिक तीव्र करावा लागतो




Ch-070.indd 4 22-09-2021 12:39:19

प्रश्न
(३)

## उपचार किती काळ चालतील? हे किती कठीण आहेत? माझे मुल दुष्परिणाम हाताळण्यास सक्षम होईल का?

उपचाराचा कालावधी ब्लडकॅन्सरचा प्रकार किंवा रोगाचा टप्पा यासारख्या विविध घटकांवर अवलंबून असतो. खाली नमूद केलेल्या वाहक तक्ता १ ALL आणि AML १ उपचार दर्शवतात. तथापि प्रत्येक रुग्णाच्या वैयक्तिक गरजेनुसार उपचारांत अनेकवेळा सुधारणा केली जाते.

**प्रवाह तक्ता १ :** तीव्र लिम्फोब्लास्टिक ल्युकेमिया आणि तीव्र मायलोईड ल्युकेमिया यांचे उपचार




- ल्युकेमिया उपचारांमध्ये तोंडावाटे गोळ्या वा पातळ औषधं शिरेतून किंवा स्नायूत आणि intrathecal म्हणजे मणक्यांमधील पाण्यामध्ये केमोथेरपी दिली जाऊ शकते. केमोथेरपीचे दुष्परिणाम आहेत, परंतु बहुतेक दुष्परिणाम हे तात्पुरते असतात आणि थोड्या कालावधीसाठी असतात. मुलाच्या वजनानुसार केमोथेरपी देत असल्यामुळे मुले केमोथेरपी चांगल्याप्रकारे सहन करण्यास सक्षम असतात .
- उपचार करणाऱ्या पेडियाट्रिक ऑंकॉलॉजिस्टने दिलेल्या सूचनांचे पालन केल्यास व नियमीतपणे योग्य लक्ष ठेवल्यास हे दुष्परिणाम कमी केले जाऊ शकतात.



Ch-070.indd 5 22-09-2021 12:39:19

प्रश्न (४)

## संपूर्ण उपचार आंतररुग्ण म्हणून/admit करून केले जातील का?

लक्षणांवरून व मुलाच्या शारीरिक स्थितीवर अवलंबून उपचार करणारा बालरोगतज्ज्ञ ओंकॉलॉजिस्ट व्यवस्थापनाची श्रेणी ठरवतो ज्यामध्ये पुरक काळजी आणि वास्तविक उपचार समाविष्ट असतात. मुलाला दाखल करून घेणे आवश्यक आहे किंवा नाही ते आजाराच्या तीव्रतेवर व शारीरिक स्थितीवर अवलंबून असते.


बहुतेक उपचार हे डे–केअर आधारावर केले जातात. म्हणजे उपचारासाठी एक दिवस मुलास दाखल केले जाते आणि काही तासांच्या उपचारानंतर त्याला परत पाठविले जाते.

जरी बहुतेक उपचार डे–केअरच्या आधारावर केले जातात तरी काही वेळा जेव्हा मुलाला तीव्र ताप किंवा इतर कोणतीही गुंतागुंतीची समस्या (complication) असेल तेव्हा त्याला दीर्घकालावधीसाठी दवाखान्यात दाखल करण्याची आवश्यकता पडू शकते.

इंडक्शन, एक्सट्राकंपार्टमेंट थेरपी, किरणोपचार किंवा दृढीकरणाच्या संपूर्ण कालावधीसाठी मुलाने दवाखान्याच्या जवळच राहाणे आवश्यक आहे.

कारण केमोथेरपीची औषधे रुग्णांची रोगप्रतिकारक शक्ती कमी करू शकतात. त्यामुळे संसर्गाशी लढण्याच्या क्षमतेवर लक्षणीय परिणाम होतो. अशा परिस्थितीत सामान्य दिसणारे जंतुसंसर्ग जीवघेणे ठरू शकतात आणि तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे लागू शकते.

१.उपचाराच्या सुरुवातीच्या पाच–सहा महिन्यांनंतर केमोथेरपी घरी राहून (Home based) सल्ल्यानुसार करता २. येते जिथे मूल तोंडावाटे केमोथेरपी औषधे घेते. आणि आवश्यक बदल करण्यासाठी प्रत्येक दोन ते तीन आठवड्यांनी रक्त चाचणी करून उपचार करणार्या बाल कर्करोगतज्ज्ञांची भेट घेणे आवश्यक आहे.




**तक्ता २** : किमोथेरपीची देखभाल




Ch-070.indd 4 22-09-2021 12:39:19

प्रश्न (५)

## इंडक्शन केमोथेरपीनंतर रोग आटोक्यात आला तरी मुलाला पुढील उपचारांची आवश्यकता आहे का?

मुलाला ळपर्वीर्लीळेपच्या पलीकडे उपचारांची आवश्यकता आहे का हे स्पष्ट करते. निदानाच्यावेळी कर्करोगाची तीव्रता शरीरात खूप जास्त असते, induction च्या शेवटी ती अशा पातळीपर्यंत खाली येते ज्यामुळे कॅन्सरच्या पेशी चाचणीमध्ये दिसत नाहीत, परंतु तरीही शरीरात कॅन्सरच्या पेशी लक्षणीय संख्येने शिल्लक रहातात. जर आपण कर्करोगाची तीव्रता आणखी खाली आणली नाही तर पुनरावृत्ती होण्याचा धोका राहतो अशाप्रकारे एकत्रीकरण, पुनर्निर्मिती आणि देखभाल या स्वरूपात पुढील उपचारांच्या गरजेवर जोर दिला जातो. उपचाराचा प्रत्येक टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून यातला कोणताही टप्पा वगळला जाऊ शकत नाही.




किमान अवशिष्टरोगाचे निदान

**तक्ता ३ :** मुलाला इंडक्शननंतरसुद्धा उपचारांची गरज का आहे हे दाखवते.

प्रश्न
(६)

## मुलावर कॅन्सरसाठी उपचार सुरु असताना आपण कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे?

कॅन्सरवर उपचार घेत असताना पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. हे प्राथमिक काळजीवाहक असतात आणि मुलाची प्रकृती शक्य तितक्या चांगल्याप्रकारे जाणतात. पालकांसाठीच्या सुचना प्रामुख्याने दोन प्रकारांमध्ये विभागल्या जाऊ शकतात.

१. **आहारासंबंधी खबरदारी :** कॅन्सरसाठी चालू असलेल्या उपचारांमुळे मुलाची रोगप्रतिकारकशक्ती कमी होते याची आपल्याला माहिती आहेच. तसेच उपचारादरम्यान काहीवेळा केमोथेरपीमुळे मुलाच्या पोटात अल्सर होतो ज्याला mucositis असे म्हणतात. या सर्व घटकांमुळे जंतुसंसर्ग होण्याचा धोका वाढतो. हा धोका कमी करण्यात आहार फार महत्वाची भूमिका बजावतो. neutropenic आहाराची वेळापत्रकं ऑनलाइन उपलब्ध आहेत ती व्यावहारिक उपयोगाची असतात किंवा नसूपण शकतात. सर्वसाधारणपणे आमचा सल्ला असा आहे की जे व्यवस्थित शिजवलेले अन्न आहे ते मुलाला द्यावे. स्वच्छ धुतलेली फळे आणि व्यवस्थित सोललेली फळे मुले खाऊ शकतात तसेच प्रक्रिया केलेले दूध आणि दुग्धजन्य पदार्थ खाऊ शकतात परंतु लोणचे किंवा मसालेदार व बाहेरचे पदार्थ देणे टाळावे.

Tumour lysis syndrome (गाठीच्या विरघळलेल्या अवस्थेत होणारा आजार)च्या संभाव्यतेमुळे उपचारांच्या पहिल्या दोन ते तीन आठवड्यांमध्ये फळांचा रस टाळा आणि उच्च पोटॅशियमचा आहार टाळावा.

२. **स्वच्छता :**

सामान्य स्वच्छता: स्वच्छतेची सामान्यमानके राखण्यासाठी अत्यंत काळजी घेतली पाहिजे विशेषतः मौखिक आणि गुदद्वाराजवळच्या जागेची (perianal) स्वच्छता राखावी.

मौखिक स्वच्छता आपल्याला माहिती आहे की आपल्या तोंडामध्ये महत्वपूर्ण जिवाणू असतात त्यापैकी बहुतेक संधीसाधू जिवाणू असतात व ते तोंडातील जखमातून रक्तप्रवाहात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात. प्रामुख्याने मौखिक स्वच्छतेची उद्दिष्टे म्हणजे प्रथम जीवाणूंचा भार कमी करणे आणि दुसरे म्हणजे शक्य तितक्या तोंडातील जखमा रोखणे.

तोंडातील जंतूंचा भार हे लहान गोलाकार फिलामेंट असलेल्या ब्रशनी स्वच्छ केल्याने किंवा स्पंज (cleaning sponge) वापरल्यास कमी होतो. तसेच chlorhexidine mouth wash वापरून गुळण्या कराव्यात. गंभीर mucositis असेल तर स्पंज किंवा ब्रश वापरणे टाळा.

तोंडातील जखमा कशा रोखाव्यात? वारंवार गुळण्या करून आणि लोसेंझेस वापरून हे साध्य करता येते. या दोन प्राथमिक उद्दिष्टांव्यतिरिक्त वेदना नियंत्रण हेदेखील मौखिक स्वच्छतेचा एक आवश्यक घटक आहे. कारण काहीवेळा वेदना असल्यास मौखिक स्वच्छता करणे कठीण असत.

क्लोरोहेक्सिडीनची शिफारस सामान्यता केली जात नाही. मात्र जर मुलाला दात घासता येत नसतील तर केली जाते. पाण्याने ओलावलेले किंवा क्लोर्हेक्सिडीनने ओले केलेले स्पंजने स्वच्छ करावे.`.

**सर्व मुलांनी त्यांचे दात दिवसातून दोन वेळा घासले पाहिजेत**



Ch-070.indd 4 22-09-2021 12:39:19


वरील सर्व उपाय केवळ संसर्ग टाळण्यासाठीच मदत करत नाहीत तर ते मुलाचे आरोग्य सुधारण्यास आणि आतड्याचे आरोग्य राखण्यातसुद्धा मदत करतात. सर्व मुलांनी दिवसातून दोनदा दात स्वच्छ केले पाहिजेत.

**(Perianal care)**

गुदद्वाराच्या भोवतालच्या जागेची काळजी

या जागेची स्वच्छता राखूनतेथील जिवाणूंचा भार कमी करा आणि बद्धकोष्टता टाळा. गुदद्वाराच्या भोवतालच्या जागी जिवाणूं मोठ्या प्रमाणात असतात. तेथील त्वचेमध्ये जखमा झाल्यास कोणताही घटक त्वचेतून रक्तप्रवाहात जाऊ शकतो वजिवाणूंच्या प्रादुर्भावाचा धोका वाढतो. मुलांना वारंवार बद्धकोष्ठता एकतर चुकीच्या सवयीमुळे किंवा चालू उपचारामुळे होते. कारण काहीही असो बद्धकोष्टता टाळण्यासाठी सर्व उपाय योजले पाहिजेत. बद्धकोष्टता टाळण्याव्यतिरिक्त जिवाणूंचा भार कमी करण्यासाठी दिवसातून तीनदा बीटाडीनसहित नियमित सीट्झ बाथ देखील घेतले पाहिजे.

बद्धकोष्ठतेच्या उपचारासाठी फ्लोचार्ट






Ch-070.indd 5 22-09-2021 12:39:19

गुदद्वाराच्या भोवतालच या जागेत जिवाणूंचा भार कमी करण्यात बीटाडीन sitz bath अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. रुग्णाने १५ ते २० मिनिटे दिवसातून तीन वेळा त्यात बसावे.
आकृती ४ मधील चित्र sitz bath घेण्याची योग्य पद्धत दाखवते



**तक्ता ४ :** चित्र चार सीट्झ बाथ योग्य पद्धतीने घेण्यासाठी असे बसावे

**प्रश्न (७)**

## ताप आल्यास काय करावे? त्याचा ताप कमी होण्याची प्रतीक्षा करू शकतो का किंवा आम्हाला त्याला लगेच डॉक्टरकडे तपासणीला न्यावं लागेल का?

ल्युकेमियावर उपचार सुरू असताना मुलांमध्ये पांढऱ्या पेशींची संख्या कमी असते पांढऱ्या पेशींची संख्या कमी असताना बाळाला ताप आल्यास febrile neutropenia असू शकतो व ही एक वैद्यकीय इमर्जन्सी मानली जाते. Febrile neutropenia, बद्दल आपण अधिक जाणून घेऊया उपचार

Febrile neutopenia याची व्याख्या.

*पांढऱ्यापेशी/ न्यूट्रोफिल्स. <०.७५ x $१०^{९}$ /L

*ताप >३८.०° डिग्रीहून जास्त >४ तासाकरता/दोन प्रसंगी किमान चार तासांच्या अंतराने ताप येणे

किंवा

जर ताप >३८.५° डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त एकदाच असेल तर

किंवा

बारीक पोटात दुखणे किंवा रूग्ण आजारी दिसत असल्यास

- न्यूट्रॉनपेनिक असलेल्या कोणत्याही मुलाला त्वरीत डॉक्टरांकडे घेऊन गेले पाहिजे आणि त्याची तपासणी केली पाहिजे. यासाठी वरील निकषानुसार febrile neutropenia चे निदान झाल्यास किंवा निरीक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, प्रतिजैविके (अँटिबायोटिक) योग्य निर्णय घेऊन सुरू करावी.
- वरील निकषांची पूर्तता सुरुवातीला झाली नाही परंतु मूल आजारी दिसत असेल तरीही मुलाला निरीक्षणासाठी दवाखान्यात दाखल केले पाहिजे.
- जर मुलाला ताप आला असेल आणि मागील केमोथेरपीच्या तीव्रतेनुसार पुढील २४ ते ४८ तासांमध्ये न्यूट्रोफिलची संख्या कमीच (०.७५ x $१०^{९}$ /L) असण्याची अपेक्षा असेल तर प्रतिजैविके सुरू करावी किंवा प्रतिजैविक सुरू करण्याचे निकष पूर्ण होईपर्यंत काळजी पूर्वक निरीक्षण करुन त्याचे निराकारण करावे.
- प्रतीजैविके सुरू करण्याचे निकष पूर्ण होत नाहीत तसेच ते स्पष्ट होईपर्यंत ताप असलेल्या neutropenic मुलाला पॅरासीटामॉल देऊ नका.
- सर्वप्रेरण आणि पुनर्प्रेरण दरम्यान चालू असलेल्या औषधांमुळे विशेषतः स्टिरॉइड्समुळे संसर्गाची नेहमीची लक्षणे दिसत नाहीत. जर शंका असेल आणि स्टिरॉइड्स घेतलेले neutropenic मूल आजारी वाटत असेल तर डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर प्रतिजैविके लगेच सुरू करावीत.

*(तापाचा रक्त किंवा रक्ताचे घटक देण्याशी काही संबंध नसावा,)



Ch-070.indd 5 22-09-2021 12:39:19

प्रश्न (८)

## सेंट्रल लाईन म्हणजे काय? ती आवश्यक आहे का? आम्ही त्याच्याशिवाय बाळाची उपचार करू शकत नाही का?

ल्युकेमिया उपचारात सेंट्रल लाईन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे हे या रुग्णांसाठी लाईफलाईन म्हणून काम करते कारण एकदा घातल्यानंतर सर्व औषधी उपचार या सेंट्रल लाईनमधून दिल्या आणि घेतल्या जातात जसे की केमोथेरपीचे औषध देणे किंवा रक्त तपासण्यासाठी रक्त काढणे आणि प्रतिजैविके देणे. रुग्णांसाठी लाईफलाईन म्हणून काम करत असताना ते जंतुसंसर्गाचा धोकादेखील वाढवतात कारण ते बाहेरील वातावरण आणि रक्त यांच्यात थेट संबंध निर्माण करतात. सेंट्रललाईनचा जंतुसंसर्ग टाळण्यासाठी योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

सेंट्रललाईनचे तीन वेगवेगळे प्रकार आहेत. आणि ते एकापेक्षा एक जास्त प्रभावी आणि उपयोगी आहेत. पण कोणती लाईन वापरायची याबद्दल प्रत्येक रूग्णालयातील धोरणानुसार डॉक्टर ठरवतात.

प्रश्न (९)

## इन्फेक्शन/जंतुसंसर्गाविरुद्ध लढण्यासाठी बालरोगतज्ज्ञ लसीकरणाची शिफारस करतात. माझ्या मुलावर कॅन्सर उपचार सुरू असल्याने आमच्या मुलाची अनेक लसीकरणे चुकली आहेत म्हणून आम्ही आता त्या लस देऊ शकतो का? आम्ही त्याच्या भावंडानासुद्धा लस देऊ शकतो का?

ल्युकेमियाचा उपचार घेत असताना सर्व नियमित लसिकरण रोखले जावे आणि फक्त बालरोगतज्ज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर Flu सारखी विशिष्ट लस दिली जावी परंतु यामुळे अनेक मुलांचे नियमित लसिकरण चुकते. उपचार पूर्ण केल्यानंतर तीन ते सहा महिन्यांनी catch up लसीकरण सुरू केले जाऊ शकते आणि वयानुसार बाल कर्करोगतज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण देऊ शकता. रुग्णाच्या भावंडांना नियमीत लसीकरण व इतर लस देता येते. भावंडांसाठी कोणतेही नियोजित लसीकरण उपचार करणाऱ्या बाल कर्करोगतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार केले पाहिजे.



Ch-070.indd 4 22-09-2021 12:39:19

**प्रश्न (१०)**

**माझी आई म्हणाली की काही आयुर्वेदिक औषधे आहेत ज्यामुळे कर्करोग पूर्ण बरा होऊ शकतो तर अशी औषधे घेणे माझ्या बालकाला सुरक्षित आहेत का?**

- कोणत्याही एका औषधाने ब्लड कॅन्सर बरा होऊ शकत नाही. केमोथेरपीवर असतांना इतर औषधे/आयुर्वेदिक औषधी टाळली पाहिजे,
- कारण ही औषधे केमोथेरपीची दुष्परिणाम वाढवू शकतात आणि काही प्रमाणात केमोथेरपी औषधांचा प्रभाव/Efficacy, कमी करू शकतात म्हणून बाल कर्करोगतज्ज्ञांच्या सल्लयाशिवाय इतर कोणतीही औषधे देऊ नयेत.